दैनिक

# लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक १६८) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार, दि.०२ जुलै २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## वारकऱ्यांचा वारीदरम्यान मृत्यू झाल्यास ४ लाखांची मदत मिळणार

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- शेकडो मैलांचा प्रवास, पायात काटे, अंगावर पाऊस, चिखल, ऊन आणि ज्ञानोबा-तुकारामाचा गजर करत हजारो वारकरी दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरच्या दिशेने निघतात. वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी यंदा महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. वारीदरम्यान कोणत्याही अपघातात एखाद्या वारकऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. यासंदर्भातले नवे परिपत्रक महसूल विभागाने आज जारी केले आहे.

यंदाच्या वारीसाठी ही योजना १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत लागू राहणार आहे. या काळात एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणांमुळे मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना ही मदत दिली जाईल. मात्र, आत्महत्या, विषबाधा (स्वखुशीने), किंवा खून यासारख्या घटनांमध्ये ही मदत मिळणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय, अपघातामुळे वारकऱ्यांचे अपंगत्व झाल्यासही सरकारने आर्थिक मदतीची तरतूद केली आहे.

# शेतकऱ्यांच्या मुद्यावरुन विधानसभेत मोठा गदारोळ

## नाना पटोलेंचे दिवसभरासाठी निलंबन



मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत मोठा गदारोळ झाला. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी भाजप आमदार बबनराव लोणीकर आणि राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून सभागृहात संताप व्यक्त केला. त्यानंतर नाना पटोले हे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या जागेजवळ गेले आणि त्यांनी राजदंडाला हात लावला. यानंतर नाना पटोले यांना एक दिवसासाठी निलंबित करण्यात आले.

नाना पटोले म्हणाले की, या सरकारमधले सदस्य बबनराव लोणीकर आणि राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे ज्या पद्धतीने सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. हा अपमान आता राज्यातील शेतकरी सहन करणार नाही. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या राज्याच्या शेतकऱ्यांची जाहीर माफी मागितली पाहिजे. ज्या पद्धतीने सातत्याने मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा बाप होऊ शकत नाही. असे वक्तव्य अजिबात चालणार नाही. त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे म्हणत नाना पटोले यांनी जोरदार संताप व्यक्त केला. यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, नाना पटोले तुमच्याकडून असंसदीय भाषेचा उपयोग होणे, मला बरोबर वाटत नाही, हे चुकीचे आहे, असे त्यांनी म्हटले.

यानंतर नाना पटोले यांनी विधानसभा अध्यक्षांच्या जागेजवळ जात आपला संताप व्यक्त केला. यानंतर राहुल नार्वेकर यांनी सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी रद्द केली. त्यानंतर राहुल नार्वेकर म्हणाले की, नाना पटोले हे सभागृहाचे अध्यक्ष राहीले आहेत. राजदंडाला हात लावल्यानंतर काय कारवाई केली जाते, याची कल्पना तुम्हाला असेल. मला कारवाई करायला भाग पाडू नका, असे त्यांनी म्हटले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे योग्य नाही, नाना पटोले यांनी माफी मागितली पाहिजे, असे म्हटले. यानंतर (पान ४ वर)

### शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अंबादास दानवे आक्रमक

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या संदर्भात विविध प्रश्न मांडत विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्य सरकारला जाब विचारला. तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याची मागणी देखील दानवे यांनी केली आहे.

राज्य सरकारने पिक विमा योजना बंद केली असून राज्यातील काही जिल्ह्यात पिक विमा योजनेत अनागोंदी झाली म्हणून सर्व शेतकऱ्यांना त्याची शिक्षा देणे योग्य नसल्याचे दानवे यांनी म्हटले आहे. या संदर्भात आज त्यांनी विधान परिषदेच्या सभागृहात विविध प्रश्न उपस्थित केले. मे आणि जून महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना अद्याप मिळालेली नाही. त्यांचे पंचनामे पूर्ण झाले आहेत का? भरपाई देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे का? असे प्रश्न देखील दानवे यांनी उपस्थित केले.

# शेतकऱ्यांचा शक्तिपीठ महामार्गाला विरोध; पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग रोखला



कोल्हापूर दि.१ (प्रतिनिधी)- नागपूर ते गोवा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात मंगळवारी राज्यातील बारा जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांनी एल्गार पुकारला. कोल्हापुरात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग सुमारे दीड तास रोखून सरकारला सज्जड इशारा दिला. कोणत्याही परिस्थितीत शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतल्याने आता सरकारची चांगलीच कोंडी होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असणारा नागपूर ते गोवा या शक्तिपीठ महामार्गाला सुरुवातीपासूनच विरोध होऊ लागला आहे. बारा जिल्ह्यातून जाणाऱ्या या शक्तिपीठ महामार्गासाठी ८६,००० कोटीचा चुराडा होणार आहे. तर हजारो हेक्टर सुपीक जमीन ही या महामार्गामुळे बाधित होणार आहे. त्यातच शेतकऱ्यांना तुलनेत कमी मोबदला मिळणार असल्याने शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्गाविरोधात कृती समितीच्या माध्यमातून राज्यातील बारा जिल्ह्यांमध्ये अक्षरशः रान पेटवले आहे.

सोमवारी कोल्हापूरसह बारा जिल्ह्यात रास्ता रोको आंदोलन करत सरकारला पावसाळ्यातही शेतकऱ्यांनी चांगलाच घाम फोडलाय. कोल्हापुरात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर पंचगंगा नदीजवळ महामार्ग रोको आंदोलन केले. यावेळी शेकडो शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत शक्तिपीठ रद्द झालाच पाहिजे असा नारा दिला.

# बाप तो बाप होता है!

## नाना पटोलेंना एकनाथ शिंदेंचे उत्तर

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- केवळ चर्चेत राहण्यासाठी काँग्रेसच्या नाना पटोले यांनी मोदींचा एकेरी उल्लेख केला, सभागृहातील राजदंड उचलण्याचा प्रयत्न केला असल्याची टीका राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मोदींवर टीका करून चर्चेत राहता येतं, त्यामुळे 'बाप तो बाप होता है' असा टोलाही शिंदेंनी नाना पटोले यांना लगावला.

एकनाथ शिंदे म्हणाले की, 'नाना पटोले हे विधानसभेचे अध्यक्ष राहिले आहेत. त्यांना सभागृहाचे नियम माहित आहे. पण ते असे का वागले याची माहिती नाही. त्यांनी राजदंड उचलण्याचा प्रयत्न पण केला. त्यांच्याकडून अशा कृतीची अपेक्षा नव्हती. गेल्या काही दिवसांपासून नाना पटोले हे चर्चेतून बाहेर पडले आहेत. त्यामुळे दिल्लीतील लोकांना दाखवण्यासाठी, चर्चेत राहण्यासाठी त्यांनी हे कृत्य केलं असावं. त्यांचे नेते राहुल गांधी हे परदेशात जाऊन मोदींवर टीका करतात. तसंच नाना पटोले यांनी केलं. पण बाप तो बाप होता है.'

# विजयी मेळाव्याला वाजत गाजत गुलाल उधळत या

## राज-उद्धव ठाकरे यांचे संयुक्त पत्रकाद्वारे मराठी जनतेला आवाहन



मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एका संयुक्त पत्रकाद्वारे मराठी जनतेला ५ जुलैच्या विजयी मेळाव्याला वाजत - गाजत येण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे हे दोन्ही भाऊ या मेळाव्याच्या निमित्ताने एका व्यासपीठावर येणार हे स्पष्ट झाले आहे. विशेषतः ठाकरे बंधू केव्हा एकत्र येणार? हा अवघ्या महाराष्ट्राला पडलेला प्रश्नही या निमित्ताने निकाली निघाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने हिंदीची सक्ती करणारा जीआर मागे घेण्याची घोषणा केली आहे. त्यानंतर स्फुरण चढलेल्या मनसे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने ५ जुलै रोजी विजयी मेळावा बोलावण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार, त्यांचा संयुक्त मेळावा ५ जुलै रोजी सकाळी १० वा. वरळी डोम येथे होणार आहे. या मेळाव्याच्या निमित्ताने उद्धव व राज ठाकरे बऱ्याच वर्षांनंतर एका व्यासपीठावर येणार आहेत. विशेष म्हणजे या दोन्ही नेत्यांनी मंगळवारी एका संयुक्त निवेदनाद्वारे मराठी जनतेला या मेळाव्यासाठी वाजत गाजत गुलाल उधळत येण्याचे आवाहन केले आहे.

# फेक नरेटिव्ह तयार करणारी फॅक्टरी अजून थांबलेली नाही

## देवेंद्र फडणवीस यांचे उद्धव ठाकरेंना उत्तर



मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातल्या त्रिभाषा सूत्रातील हिंदी किंवा अन्य भाषा शिकण्यासंबंधीचे दोन शासन आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने २९ जूनच्या संध्याकाळी मागे घेतले. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजपा म्हणजे अफवांची फॅक्टरी आहे अशी टीका केली होती. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या टीकेला आपल्या खास शैलीत उत्तर दिलं आहे.

फेक नरेटिव्ह तयार करणारी फॅक्टरी अजून थांबलेली नाही. लोकसभेला फेक नरेटिव्हच्या मदतीने यांनी एक यश मिळवलं पण विधानसभेला आपण त्यांना थेट नरेटिव्हने उत्तर दिलं. आता महापालिकेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत, जिल्हा परिषदेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत आता महाराष्ट्रापासून मुंबईला तोडण्याचा कट सुरु झाला आहे. अशी भाषणं आता ऐकायला मिळणार आहेत. तुमच्यातही ही ताकद नाही आणि कुणाच्या बापामध्ये ही ताकद नाही की मुंबईला महाराष्ट्रापासून तोडू शकाल असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंचं नाव न घेता त्यांच्यावर टीका केली आहे. उद्धव ठाकरेंनी भाजपाचा उल्लेख अफवांची फॅक्टरी असा केला होता. त्या टीकेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज उत्तर दिलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, 'भाजपाचं सरकार आल्यानंतर मुंबईचा चेहरा आम्ही बदलून दाखवला. मुंबई महानगरपालिका म्हणजे सोन्याचं अंडं देणारी कोंबडी समजून तुम्ही अंडी खात राहिलात आणि शेवटी ती कोंबडी चिरण्याचं कामही तुम्ही केलंत. मुंबईतल्या मराठी माणसाला, गिरगावातल्या मराठी माणसाला (पान ४ वर)

# रविंद्र चव्हाण भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष



मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- भारतीय जनता पक्षाचे नेते रविंद्र चव्हाण यांची महाराष्ट्राचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून आज (१ जुलै) निवड करण्यात आली आहे. भाजपाचे नेते तथा केंद्रीय संसदीय कार्य व अल्पसंख्याक विकासमंत्री किरेन रिजिजू यांनी ही अधिकृत घोषणा केली आहे. काही दिवसांपूर्वीच रवींद्र चव्हाण यांच्यावर भाजपा प्रदेश कार्यकारी अध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. मात्र, आता त्यांची प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे रविंद्र चव्हाण हे भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष असणार आहेत.

चंद्रशेखर बावनकुळे यांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्यामुळे रविंद्र चव्हाण यांच्यावर आता ही जबाबदारी देण्यात आली आहे. रविंद्र चव्हाण यांच्या निवडीबाबत भाजपाने मुंबईत एक कार्यक्रम आयोजित केला (पान ४ वर)

# फडणवीसांनी शिवसेना फोडण्याचा जीआर काढला तरी मराठी माणूस एकत्र-संजय राऊत

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- दोन ठाकरे बंधू एकत्र येऊ नये असा काही जीआर आम्ही काढला नाही, त्यांनी एकत्र यावं आणि किक्रेट खेळावं, जेवण करावं. आम्हाला त्याचा काही फरक पडणार नाही, असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले होते. आता यावरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार पलटवार केलाय.

संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत विविध मुद्द्यांवर भाष्य केले. ते म्हणाले की, माझी काल मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याशी चर्चा झाली. उद्धव ठाकरे यांच्याशी पण चर्चा झाली. त्यानंतर असे ठरले की, वरळीला जे दोन सभागृह आहे तेथे पाच जुलैला विजयी मेळावा करावा. पण त्याचसोबत या कार्यक्रमासाठी शिवसेनेने आधी शिवतीर्थ मिळावे, यासाठी विनंती अर्ज केलेला आहे. कारण, मराठी माणसाचा हा सोहळा शिवतीर्थावर व्हावा, अशी आमची भूमिका होती. आमचा अर्ज अजूनही पेंडिंग आहे. अनिल परब त्यासाठी नक्कीच प्रयत्न करत आहेत. पण, हे सरकार आम्हाला परवानगी देणार नाही हे आम्हाला माहिती आहे. त्यामुळे मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी डोमचा पर्याय सुचवला आणि तो आम्ही स्वीकारला. त्या संदर्भात काल एक बैठक देखील झाली. त्या बैठकीमध्ये कार्यक्रमाचे स्वरूप कसे असावे? किती माणसे येतील? याबाबत चर्चा करण्यात आली. पाच जुलैला साधारण बारा ते साडेबाराच्या दरम्यान हा कार्यक्रम सुरू होईल. कार्यक्रमाला उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे उपस्थित राहतील. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर ठाकरे बंधू एकत्र येतील, याविषयी आता शंका असण्याचे कारण नाही, असे संजय राऊत म्हणाले.

संजय राऊत पुढे म्हणाले की, आम्हाला दिल्लीला दाखवायचे आहे की, जेव्हा जेव्हा दिल्लीने आघोरी कायद्यांच्या आधारे किंवा सत्तेच्या आधारे आमच्यावर हल्ले केले, तेव्हा महाराष्ट्र अधिक ताकदीने उसळून उभा राहिला. हे आम्हाला नरेंद्र मोदी, अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांना दाखवायचे आहे. म्हणून त्यांना मी आज जय महाराष्ट्र केलेला आहे, असे त्यांनी म्हटले.

# राणे कुटुंबाची चोच नेहमीच नरकात बुडालेली असते

## ठाकरे गटाचे भास्कर जाधव यांची टीका

मुंबई दि.१ (प्रतिनिधी)- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी भाजप खासदार तथा माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे तथा त्यांचे सुपुत्र नीतेश राणे यांच्यावर तिखट हल्ला चढवला आहे. नारायण राणे हा एहसान फरामोश अर्थात कृतघ्न असा माणूस आहे. मनसे नेते प्रकाश महाजन यांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे. राणे कुटुंबाची चोच नेहमीच नरकात बुडालेली असते, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी नीतेश राणे यांच्यावरही नेपाळी वॉचमन म्हणत निशाणा साधला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्याचे वादग्रस्त त्रिभाषा धोरण रद्द करण्याची घोषणा केली आहे. त्यानंतर राज व उद्धव ठाकरे यांनी ५ जुलै रोजी मुंबईत विजयी मेळावा घेण्याची घोषणा केली (पान ४ वर)

# बीड लैंगिक छळ प्रकरणातील शिक्षकांच्या पोलीस कोठडीत ५ जुलैपर्यंत वाढ

बीड दि.१ (प्रतिनिधी)- अल्पवयीन विद्यार्थिनीवर लैंगिक छळ केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या दोन शिक्षकांची पोलीस कोठडी वाढवण्यात आली आहे. आरोपी शिक्षक विजय पवार आणि प्रशांत खाटोकर यांना आज बीड येथील न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांची पोलीस कोठडी ५ जुलै २०२५ पर्यंत वाढवण्याचा आदेश दिला.

या प्रकरणात दोन्ही आरोपींना याआधी दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. आज ती कोठडी संपल्यानंतर त्यांना पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांनाही पाच जुलैपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

विजय पवार आणि प्रशांत खाटोकर हे दोघे जण खाजगी कोचिंग क्लासेस चालवतात. या दोघांकडून नीटची तयारी करणाऱ्या मुलीची छेड काढून क्लासेसच्या केबिनमध्ये लैंगिक छळ केला जात होता. घडलेला प्रकार मुलीने आपल्या मैत्रिणीला सांगितला. मात्र, शिक्षकांकडून होणारा त्रास असाह्य झाल्याने मुलीने हा संपूर्ण प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला. मुलीच्या आईने शिवाजीनगर पोलिस ठाणे गाठले. या तक्रारीनंतर दोन्ही शिक्षकांविरोधात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. दोन दिवसांपूर्वी त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. ही कोठडी संपल्यानंतर दोघांनाही न्यायालयात हजर करण्यात आले होते. सुनावणीनंतर न्यायालयाने पाच जुलैपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदी पाकिस्तानची निवड

## १९३ पैकी १८२ देशांचा पाठिंबा

नवी दिल्ली दि.१ (वृत्तसंस्था)- संयुक्त राष्ट्राच्या सर्वात महत्त्वाचे अंग असलेल्या सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदी पाकिस्तानची निवड झाली आहे. १९३ पैकी १८२ देशांचा पाठिंबा मिळवून पाकिस्तान या पदावर विराजमान झाला. दहशतवादाला पोसणारा पाकिस्तानच संयुक्त राष्ट्रामध्ये आता महत्त्वाच्या स्थानावर गेल्यामुळे भारताची मात्र डोकेदुखी वाढण्याची शक्यता आहे.

पाकिस्तानने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदाची सूत्रे मंगळवारी (१ जुलै) हाती घेतली आहेत. याआधी जानेवारी २०२४ मध्ये पाकिस्तानची दोन वर्षांसाठी युएनएससीचा अस्थायी सदस्य म्हणून निवड झाली होती. आता १९३ सदस्यांपैकी १८२ सदस्यांचा पाठिंबा मिळवत पाकिस्तान सुरक्षा परिषदेच्या अध्यक्षपदी विराजमान झाला. पाकिस्तानची ही निवड जुलै महिन्यासाठी असणार आहे.

पाकिस्तानचे राजदूत मुनिर अकरम यांच्या नेतृत्वात आता युएनएससीमध्ये जुलै महिन्यातील महत्त्वाच्या चर्चांची दिशा ठरवली जाणार आहे. पाकिस्तानने ही नवी जबाबदारी 'भू-राजकीय पारदर्शकता, समावेशकता' या तत्त्वांवर आधारलेली असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

एकीकडे हे पद मिळवण्यासाठी पाकिस्ताने मोठा आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळवला. तर दुसरीकडे भारताने पाकिस्तानच्या दुटप्पी भूमिकेवर जोरदार टीका केली. 'दहशतवादाला पोसणारा देश' असं म्हणत भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी पाकिस्तानवर टीका केली. जेव्हा एखादा देश आपल्या शेजारी देशाविरुद्ध दहशतवादाला पाठीशी घालतो, तेव्हा तो केवळ एकाच देशासाठी नव्हे, तर संपूर्ण जागतिक सुरक्षेसाठी धोका असतो अशा शब्दात एस जयशंकर यांनी तीव्र निषेध केला.

भारताने अलीकडेच पाकिस्तानातील दहशतवादी अड्ड्यांवर कारवाई केली आहे. तसेच सिंधू पाणी करार निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानची युएनएससी अध्यक्षपदी निवड होणे हे अनेक आंतरराष्ट्रीय धोरणात्मक प्रश्न उपस्थित करते.

# महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेमध्ये पर्यावरणस्नेहींनी गाठला ५ लाखांचा टप्पा

## राज्यात ५ लाखांवर ग्राहकांना ६ कोटींचा आर्थिक फायदा

छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) – वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये ५ लाखांचा टप्पा गाठला आहे. या योजनेत सोमवार (दि. ३०)पर्यंत सहभागी झालेल्या ५ लाख ३ हजार ७९५ वीजग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल ॲप व www.mahadiscom.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी केले आहे.

वार्षिक १२० रूपयांचा फायदा – महावितरणकडून पर्यावरणपूरक 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती.

पर्यावरणस्नेही ५ लाख ग्राहकांचा प्रतिसाद – वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. या योजनेत आतापर्यंत ५ लाख ३ हजार ७९५ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार ४०० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये (कंसात आर्थिक फायदा रूपयांत) पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक २ लाख १ हजार २३३ (२.४२ कोटी), कोकण- १ लाख १३ हजार २५४ (१.३६ कोटी), उत्तर महाराष्ट्र- ७० हजार २२६ (८४.२७ लाख), विदर्भ- ६३ हजार ७३१ (७६.४७ लाख) तसेच मराठवाड्यामध्ये योजनेत सहभागी ५५ हजार ३५१ वीजग्राहकांना ६६ लाख ४२ हजार रूपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

गो-ग्रीन योजनेचे फायदे – महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे.

वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसां मध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते.

यासह महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) – छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीने आज माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंती निम्मित अभिवादन करण्यात आले.

सिडको बसस्थानक परिसरातील वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास मा.उप आयुक्त लखीचंद चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी माहिती व जनसंपर्क विभागाचे अतुल बनकर, संतोष कोठाळे, करण साळवे यांची उपस्थिती होती.

# सुरक्षा ठेवीवर वीज ग्राहकांना १४ कोटींचा परतावा

छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) – महावितरणकडे जमा असलेल्या वीजबिलांच्या सुरक्षा ठेवीवर छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील १० लाख १९ हजार १९९ लघुदाब वीजग्राहकांना २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी १३ कोटी ८० लाख रुपये व्याज देण्यात आले आहे. ही रक्कम संबंधित ग्राहकांच्या वीजबिलांमध्ये समायोजित करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर शहर मंडलातील ३ लाख ६७ हजार ३८८ ग्राहकांना ६ कोटी ६५ लाख रुपये, छत्रपती संभाजीनगर ग्राम ीण मंडलातील ४ लाख ७४ हजार ५०४ ग्राहकांना ५ कोटी ७ लाख रुपये तर जालना मंडलातील २ लाख ४ हजार ३०७ ग्राहकांना २ कोटी ८ लाख व्याज देण्यात आले आहे. सुरक्षा ठेव म्हणजे काय? दरवर्षी ती का घेतली जाते? त्यावर व्याज मिळते का? असे एक नाही तर असंख्य प्रश्न सामान्य वीजग्राहकाला नेहमीच पडत असतात. मुळात महिनाभर वीज वापरल्यानंतर ग्राहकांना महावितरण वीजबिल देते. ते भरण्यासाठी २१ दिवसांची मुदत देते. मुदत संपल्यानंतरही बिल न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्यासाठी १५ दिवसांची नोटीस देते. हा सर्व कालावधी दोन महिन्यांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार हमी म्हणून ग्राहकांकडून मागील वार्षिक वीजवापराच्या सरासरी दुप्पट तसेच त्रैमासिक बिलिंग असलेल्या ग्राहकांची सुरक्षा ठेव दीडपट करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

महावितरण वर्षातून एकदा वीजवापराच्या अनुषंगाने सुरक्षा ठेवीचे पुनर्निर्धारण करू शकते. एखाद्या ग्राहकाची सुरक्षा ठेव ही त्याच्या आर्थिक वर्षातील दोन महिन्याच्या सरासरी रकमेपेक्षा कमी असेल तर संबंधित ग्राहकाला अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बिल दिले जाते. ग्राहकांनी यापूर्वी सुरक्षा ठेव जमा केली असली तरी वीजदर आणि वीजवापर यामुळे वीजबिलाची रक्कम वाढली असेल तरच त्यातील फरकाच्या रकमेचे बिल म्हणून अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बिल जाते. ज्या ग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा महावितरणकडे भरणा केला नसेल त्यांची ती थकबाकी सुरक्षा ठेवीतील व्याजामधून वळती करण्यात येते. ग्राहकांनी जमा केलेल्या सुरक्षा ठेवीवर भारतीय रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे व्याज देण्याचेही विद्युत नियामक आयोगाचे निर्देश आहेत. महावितरणकडे जमा असलेली सुरक्षा ठेव ही ग्राहकांचीच रक्कम असून वीजपुरवठा कायमस्वरूपी बंद करताना ही ठेव ग्राहकाला व्याजासह परत केली जाते. यामुळे ग्राहकांनी अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा वेळीच भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि. १ (प्रतिनिधी) – माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी प्रवीण फुलारी व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी अभिवादन केले. स्व. वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरा केला जातो.

महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. अधिक उत्पन्न देणाऱ्या बियाणांचा वापर, सिंचनाच्या पद्धतींचा विस्तार आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रचार करून त्यांनी राज्यात हरित क्रांती घडवून आणली. त्यांच्या जयंतीनिमित्त (१ जुलै) कृषी दिन साजरा केला जातो. त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात चार कृषी विद्यापीठांची स्थापना झाली, ज्यात राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ (१९६८), अकोला कृषी विद्यापीठ (१९६९), परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि दापोली येथील कोकण कृषी विद्यापीठाचा समावेश आहे. यामुळे शेतीत संशोधन आणि शिक्षणाला चालना मिळाली.

जलसंधारणाच्या कामांवर त्यांनी विशेष भर दिला आणि पाझर तलाव व वसंत बंधाऱ्यांच्या निर्मितीचे श्रेय त्यांना दिले जाते. रोजगार हमी योजना सुरू करण्यात त्यांचे मोठे योगदान मानले जाते. लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने त्यांनी पंचायत राज समितीचे अध्यक्ष म्हणून काम केले आणि त्यांचा २९३ पानांचा अहवाल महत्त्वाचा ठरला.

वसंतराव नाईक हे एक दूरदृष्टीचे, संवेदनशील आणि शेतकऱ्यांशी जोडलेले नेते होते. त्यांना 'शेतकऱ्यांचे मुख्यमंत्री' आणि 'ग्रीन वॉरियर' म्हणूनही ओळखले जाते. दुष्काळात त्यांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवण्याचा संकल्प केला होता.

# वाढदिवसानिमित्त ज्येष्ठांना पुस्तकांची भेट



पुणे (पिंपळे सौदागर), दि. १ (प्रतिनिधी) – वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने येथील उन्नती सोशल फाउंडेशनतर्फे ज्येष्ठ नागरिकांना वाढदिवसानिमित्त पुस्तके भेट देण्यात आली. ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पिंपरी चिंचवड मधील युवा उद्योजक विवेक भिसे यांच्याहस्ते पंचवीस ज्येष्ठांना पुस्तक आणि नॅपकीन भेट स्वरुपात देण्यात आले.

सोमवार दि. ३० जून रोजी सायंकाळी पीसीएमसी मैदानावर डॉ. सुभाष पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात उद्योजक विवेक भिसे यांच्यासह कुंदन झिंजुर्डे, सखाराम ढाकणे, शोभा राजगुरे, निर्मला कासार आणि शकुंतला शिंदे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर अशोक येळंमकर, रवींद्र संदानशिवे, सुरेखा पाटील, सुरेंद्र पागेदार, रेखा येळंमकर आदींनी विविध गाणी, कविता सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि संचलन शकुंतला शिंदे यांनी केले. सखाराम ढाकणे यांनी आभार मानले. भामिनी महाले यांनी राष्ट्रगीत सादर करुन कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विवेकानंद लिगाडे, रमेश वाणी, अनिलकुमार शाह, रमेश लांडगे, सुभाष पाटील, जयपाल सिदनाळे आदिंची परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र राज्यस्तरीय रेडिओ श्रोता संमेलन आयोजकांची वैजापूरला धावती भेट



वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) – पुढील महिन्यात अहिल्यानगर येथे १९ व २० ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्यातील रेडिओ व आकाशवाणी श्रोत्यांचे राज्यस्तरीय भव्य संमेलन आयोजित करण्यात आलेले आहे.

या संमेलनाची तयारी जोरात चालू असून हे संमेलन अविस्मरणीय राहणार आहे. या संमेलनाच्या आयोजना बाबत चर्चा करण्यासाठी शुक्रवार(ता,०४)रोजी अहिल्यानगर येथे एक बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

या विषयी चर्चा करण्यासाठी या संमेलन आयोजन समितीचे सदस्य अशोक पाटील यांनी मंगळवार(ता.०१)रोजी धावती भेट देऊन येथील सिलोन रेडिओ व आकाशवाणी चे जेष्ठ श्रोते ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत व आप्पासाहेब जाधव यांच्याशी चर्चा विनमय केली. त्यांच्या समवेत त्यांच्या पत्नी सौ, पुष्पा अशोक पाटील ही होत्या.

# वैजापूरात डॉक्टर्स दिनानिमित्त डॉक्टर्स व आरोग्य कर्मचारी सत्कार व अभिनंदन



**उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.बी.एन. मोरे, श्री. चौधरी यांना शुभेच्छा देतांना लोकसेवा रुग्णमित्र मंडळ**

वैजापूर, दि. १ (प्रतिनिधी) – लोकसेवा रुग्णमित्र मंडळ या रास्वसंच्या सेवाभावी संस्थेच्या वतीने मंगळवार(ता.०१)रोजी येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ.बी.एन. मोरे व त्याचे सहकारी वैद्यकीय अधिकारी,सर्व आरोग्य कर्मचारी वर्ग यांचा राष्ट्रीय डॉक्टर्स दिन निमित्त गुलाब

पुष्प देऊन हृदयी सत्कार व अभिनंदन करून या दिनाच्या शुभेच्छा दिल्या.या लोकसेवा रुग्ण मंडळाचे सर्वश्री उद्धव सोनवणे,नवनाथ कुंदे,माजी सैनिक कचरू देवरे, दगडू कडवे,गंभीर देशमुख,अतुल जाधव, कपिल जाधव व जिल्हा आरोग्य समिती सदस्य तथा जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत, या सर्वांनी वैद्यकीय अधिकारी, आरोग्यकर्मचारी यांना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा दिल्या. आरोग्य कर्मचारी श्री.चौधरी, आप्पासाहेब जाधव यांची उपस्थिती होती.

# मुदखेड येथे दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद



मुदखेड (जि. नांदेड), दि. १ (प्रतिनिधी) – जल जीवन मिशन अंतर्गत 'स्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण' या विषयावर आधारित दोन दिवसीय अनिवासी प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

हा कार्यक्रम जिल्हा परिषद नांदेड व के.आर.सी. टेक्नोस्पर्ट रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने यशस्वीरित्या पार पडला. प्रशिक्षणामध्ये जल जीवन मिशनची सविस्तर माहिती व जलस्रोतांचे परीक्षण या महत्त्वाच्या बाबींवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. हे प्रशिक्षण विविध सत्रांमध्ये पीपीटी सादरीकरण तसेच खेळ व प्रात्यक्षिके यांच्या माध्यमातून घेण्यात आले. कार्यक्रमात प्रवीण प्रशिक्षक श्री. राजू गुट्टे, किशोर वाघदरीकर, अभय भंडारे, साईनाथ मंचेवार, यांनी विषयाचे प्रभावी सादरीकरण केले. या प्रशिक्षण सत्रास विस्तार अधिकारी पांडुरंग हंबर्डे, गट समन्वयक लक्ष्मीकांत टाकळकर यांनी उपस्थित राहून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये टेक्नोस्पर्ट ग्राम विकास प्रतिष्ठानचे सचिव श्री. शैलेश सिसोदिया सर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. तर संपूर्ण प्रशिक्षणाचे नियोजन प्रशिक्षण समन्वयक पांडुरंग हूलेकर, लक्ष्मीकांत पंडित, पवन काशिदे, सुधाकर माने व विकास काशीदे अभिषेक हातागळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. हा प्रशिक्षण कार्यक्रम स्थानिक विकास व जलस्रोत शाश्वतीकरणासाठी प्रभावी पाऊल ठरला असून उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांकडून याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

# भगवाधारी रेपिस्टला पद्मश्री : भारतीय सर्वोच्च सन्मानाची विटंबना

**भारत** सरकारने यावर्षी कार्तिक महाराज उर्फ कृष्ण चंद्र मिश्रा यांना पद्मश्री पुरस्कार देऊन एक धक्कादायक आणि संतापजनक निर्णय घेतला आहे. हा पुरस्कार, जो सामाजिक कार्य आणि देशासाठी उल्लेखनीय योगदानासाठी दिला जातो, अशा व्यक्तीला प्रदान करणे, ज्याच्यावर गंभीर बलात्कार, लैंगिक शोषण आणि फसवणुकीचे आरोप आहेत, हा भारतीय समाजाच्या नैतिकतेवर आणि सरकारच्या निर्णयप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतो. केंद्र सरकार हा नेमका कोणता संदेश देऊ इच्छिते? की, गंभीर गुन्ह्यांचे आरोप असलेल्या व्यक्तींना सन्मानित करणे हा आता नवीन सामान्य आहे? की, भगव्या वस्त्रांचा आडोसा घेऊन गुन्हे करणाऱ्या तथाकथित 'महाराजांना' देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवले जाईल?

कृष्ण चंद्र मिश्रा, जे स्वतःला कार्तिक महाराज म्हणवतात, यांच्यावर एका महिलेने अत्यंत गंभीर आरोप केले. मुर्शिदाबाद, पश्चिम बंगाल येथील नबग्राम पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार, या भगवाधारी बाबाने नोकरीच्या बहाण्याने तिला आपल्या आश्रमात बोलावले, तिला शिक्षक म्हणून नियुक्त केले आणि त्यानंतर तिच्यावर ६ महिन्यात १२ वेळा वारंवार लैंगिक अत्याचार केले. इतकेच नव्हे, तर जबरदस्तीने गर्भपात आणि फसवणूक यासारखे गंभीर गुन्ह्यांचा पण त्याच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे. अशा व्यक्तीला, ज्याच्यावर अजूनही कायदेशीर चौकशी सुरू आहे आणि ज्याच्या कृत्यांनी एका महिलेचे आयुष्य उद्ध्वस्त केले, त्याला पद्मश्रीसारखा मानाचा पुरस्कार देणे हा देशातील प्रत्येक सुज्ञ नागरिकाचा अपमान आहे.



हा पहिलाच प्रसंग नाही जिथे भारतीय जनता पार्टी (भाजप) आणि त्यांच्या सरकारवर गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना पाठिशी घालण्याचे आरोप होत आहेत. यापूर्वी गुजरातमध्ये बलात्काराच्या गुन्ह्यांशी संबंधित व्यक्तींचे हार-तुरे घालून स्वागत झाल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. आता तर केंद्र सरकारने एका पायरी पुढे जाऊन अशा तथाकथित 'महाराजाला' थेट पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे. याचा अर्थ काय? की, भगवे कपडे घालून, आश्रमाच्या नावाखाली गुन्हे करणाऱ्या माणसांना देशाच्या सर्वोच्च सन्मानाने नवाजले जाईल? की, महिलांवरील अत्याचारांचे आरोप असलेल्यांना सरकार संरक्षण देईल? हा निर्णय म्हणजे देशातील महिलांच्या सुरक्षिततेचा आणि न्यायव्यवस्थेचा थट्टाच आहे. पद्मश्री हा पुरस्कार देशातील थोर व्यक्तींना त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी दिला जातो. परंतु, कार्तिक महाराजासारख्या व्यक्तीला हा पुरस्कार देऊन सरकारने या सन्मानाची प्रतिष्ठा धुळीला मिळवली आहे. ज्या व्यक्तींनी खरोखरच सम ाजासाठी आपले आयुष्य वेचले, ज्यांनी शिक्षण, विज्ञान, कला, क्रीडा किंवा इतर क्षेत्रात देशाचे नाव उज्ज्वल केले, त्यांना या भगवाधारी ढोंगी महाराजाच्या बरोबरीने बसवले जाणे हे त्यांच्यासाठी अपमानास्पद आहे. खरे तर, अशा व्यक्तींना या पुरस्काराचा सन्मान वाटणार का? की, त्यांना या पुरस्काराचा अभिमान वाटण्याऐवजी लाज वाटेल?

कार्तिक महाराजासारख्या व्यक्ती भगव्या वस्त्रांचा आडोसा घेऊन आपल्या काळ्या कृत्यांना पांघरूण घालतात. भगवे वस्त्र हे अध्यात्म, संन्यास आणि त्यागाचे प्रतीक आहे, परंतु अशा ढोंगी बाबांनी या पवित्र रंगाला कलंकित केले आहे. सरकारने अशा व्यक्तींना सन्मानित करून या पवित्र रंगाचा आणि भारतीय संस्कृतीचा अवमान केला आहे. हे थांबले पाहिजे. भगव्या वस्त्रात लपलेल्या या राक्षसांना उघडे करणे आणि त्यांना कठोर शिक्षा देणे गरजेचे आहे.

केंद्र सरकारने कार्तिक महाराज यांना पद्मश्री पुरस्कार देऊन आपली संवेदनशीलता आणि जबाबदारी यांचा अभाव दाखवला आहे. हा निर्णय म्हणजे देशातील महिलांवरील अत्याचारांना प्रोत्साहन देणारा आणि न्याय व्यवस्थेची थट्टा करणारा आहे. सरकारने तातडीने या पुरस्काराचा फेरविचार करावा आणि कार्तिक महाराज यांच्यावरील आरोपांची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांना कठोर शिक्षा द्यावी. अन्यथा, हा पुरस्कार आणि सरकारची विश्वासार्हता दोन्ही कायमचे डागाळली जाईल. देशातील जनता आता मूक राहणार नाही; ती या ढोंगीपणाविरुद्ध आवाज उठवेल आणि न्यायाची मागणी करेल!

**–डॉ. रियाज़ देशमुख,**
एसीपी (रि), छत्रपती संभाजी नगर

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# नक्षत्रवाडी ते रेल्वे स्टेशन ब्रीज दरम्यान केलेल्या कारवाईत एकूण ३६२ अतिक्रमण काढले









छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार आणि नियंत्रण अधिकारी अतिक्रमण विभाग संतोष वाहुळे यांच्या उपस्थितीत मनपा हद्द नक्षत्रवाडी ते रेल्वे स्टेशन ब्रीज दरम्यान केलेल्या कारवाईत एकूण ३६२ एवढी पक्की आणि कच्ची बांधकामे ज्यामध्ये हॉटेल,लॉज, दुकाने, शेड, कंपाऊंड, ओटे, गॅरेज, वॉशिंग सेंटर, कमान,जाहिरात फलक,इ. निष्कासित करण्यात आले आहेत. सदर कारवाई मध्ये महानगरपालिकेच्या २०० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा तर पोलीस विभागाचे १५० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या कारवाईसाठी १० जेसीबी,२ पोकलॅन,१० टिप्पर, २ रूग्णवाहिका, २ कोंडवाडा वाहने,२ अग्निशमन बंब,२ इलेक्ट्रिक हायड्रॉलीक वाहने इ. वाहनांचा समावेश होता. सदरील कारवाई मध्ये नगररचना विभागाचे उप संचालक मनोज गर्जे,यांत्रिकी विभागाचे अमोल कुलकर्णी, सहायक पोलीस आयुक्त रणजीत पाटील, अतिक्रमण उपायुक्त सविता सोनवणे,सहाय्यक आयुक्त अर्जून गिराम,प्राजक्ता वंजारी,अर्चना राजपूत,रमेश मोरे,संजय सुरडकर,अशोक गिरी,सय्यद समीउल्लाह,भारत बिरारे,राहूल जाधव,नईम अन्सारी इमारत निरीक्षक कुणाल भोसले,शिवम घोडके,सागर श्रेष्ठ, तृप्ती जाधव,सय्यद मजहर अली, नगररचना विभागाचे सौरभ साळवे, सूरज संवडकर,राहूल,शिवाजी लोखंडे व नागरी मित्र पथकाचे प्रमोद जाधव हे कर्मचारी उपस्थित होते.

उद्या दि ०२ जुलै रोजी पुरता अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई होणार नाही, अशी माहिती श्री वाहूळे यांनी दिले आहे.

# चितेगाव येथील खूनप्रकरणातील बेपत्ता संशयिताचा मृतदेह आढळल्याने खळबळ

पैठण दि.१ (प्रतिनिधी)- पैठण तालुक्यातील चितेगाव येथील एका खून खटल्यातील संशयित आरोपी शेख अकबर महबूब मियाभाई शेख याचा मृतदेह दादेगाव (ता. पैठण) शिवारात आढळला. या घटनेमुळे चितेगाव परिसरात खळबळ उडाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, सपोनि निलेश शेळके यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. घातपात झाला का? या संदर्भात पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पैठण तालुक्यातील चितेगाव येथील एका खून प्रकरणातील आरोपी असलेले शेगाव अकबर उर्फ मियाभाई महेबूब शेख (वय ५०) कारने पंढरपूर येथे गेले होते.

परंतु, त्यांच्याशी घरच्यांनी संपर्क केला असता फोन उचलला नाही. त्यामुळे नातेवाईकांनी बिडकीन पोलीस ठाण्यात दि.३० जूनरोजी तक्रार दाखल केली होती.

शेख यांचे दोन मोबाईल ढोरकिन गावाच्या परिसरात आढळून आले. आज (दि.१) दादेगाव (ता. पैठण) परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह असल्याची माहिती पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांना मिळाली. त्यांनंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यावेळी कार घटनास्थळी आढळून आली नाही. त्यामुळे हा प्रकार घातपात आहे का ? या संदर्भात पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# वामनदादांच्या शिष्यांना गीतरूपी आदरांजली, क्रांतीगायकांची एकत्रित मैफल गाजली!

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- 'वंदन माणसाला' या चेतन चोपडे या गायकाने गायिलेल्या गीताने सुरु झालेला 'वामनवेलीवरील दोन फुलांचा जन्मोत्सव'उत्तरोत्तर रंगतच गेला. शनिवारी रात्री संत एकनाथ रंगमंदिरात ही वामनगाणी दुमदुमली. महाकवी वामनदादा कर्डक यांचे पट्टशिष्य गायक दिवंगत प्रतापसिंगदादा बोदडे आणि विजयानंद जाधव यांना गीतरुपी आदरांजली वाहण्यासाठी शहरातील नामवंत गायकांनी एकत्र येण्याचे हे दुरे वर्ष होय. यावर्षीही या उपक्रमाला भरभरुन प्रतिसाद मिळाला.

छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करुन ही गीत मैफिल सुरु झाली. प्रा. दिलीप महालिंगे यांनी संहितेतून चळवळीतील आजच्या वास्तवावर बोट ठेवत केलेली चिरफाड हे या कार्यक्रमाचे खास वैशिष्ठ्य ठरले. अधून मधून त्यांनी ' मी आलो' असं सांगत करुन दिलेला देणगीदारांचा परिचयही रंजक ठरला. यात यशवंत येरेकर, संतोष भिंगारे, विजय मगरे आदींचा समावेश होता.

मिळे तुपात पोळी, भीमा तुझ्यामुळे हे विजयनानंद जाधव लिखित गाणे प्रख्यात गायक अजय देहाडे यांनी गायले आणि त्याच्यावर बक्षीसांचा वर्षाव होत राहिला. त्यांनी गायिलेले ' तुफानातले दिवे' हे वामनदादांचं गाणही हिट ठरलं. नामवंत गायक कुणाल वराळे यांनी गायिलेली ' भीमाचे गोंधळी' व शाहू राजा.... असा दिलदार राजा ही दोन्ही गाणी हिट ठरली.निकिता बंड यांनी गायलेल्या ' भीमाची लेखणी' व ' माझं माहेर आंबवडे' या दोन्ही गाण्यांना रसिकांचा टाळ्यांचा प्रतिसाद मिळाला.

तर ' बरं झालं घटनाकार तू झाला' व ' भीमाच्या इंग्रजीला' ही दोन गाणी विजय पवार यांनी खुबीने गायिली. ' युगे येतील आणिक जातील' व 'जमाखर्च दाखवा' ही दोन गाणी अक्षय जाधव यांनी गाऊन प्रशंसा मिळवली. अन्यायाची चिरा आणि ऐका भीमाचा सल्ला या सचिन भुईगळ यांनी गायलेल्या गाण्यांवर रसिकांनी ठेका धरला. भारतभूच्या मुला हे चेतन चोपटे यांनी गायिलेले गाणे हिट ठरले. दोघांच्या गावाचे या अहिर भैरवीतील समूह गीताने मैफलीचा समारोप झाला.



# समाधीस्थ आचार्य १०८ विद्यासागरजी महामुनीराज दीक्षा दिवस साजरा

## अष्टांनिका महापर्व निमित्त श्री सिद्धचक्र महामंडल विधानाचे उपाध्याय विरंजन सागर जी महाराज याचा सानिध्यात आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- १००८ भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुख नगर येथे समाधिस्त आचार्य विद्यासागर जी महाराजांचा ५८वा मुनि दीक्षा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी चार्तुमास साठी विराजमान असलेले जन संत १०८ उपाध्याय वीरंजन सागर जी मुनी महाराज ससंघ होत. सर्वप्रथम सकाळी भगवताचा अभीषेक करण्यात आला तदनतर प्रथम आचार्य श्री चे चित्र अनावरण, दीप प्रज्वलन तदनंतर उपाध्याय संघाला शास्त्र दान आणि नंतर संगीतमय अष्ट द्रव्य सहित पूर्ण भक्ती भावाने विद्यासागर महाराजांचे पूजन झाले यात विशेषता महिला मंडळाने आणि खानदेश स्वाध्याय ग्रुपने आपली उपस्थिती नोंदविली यावेळी उपाध्याय



वीरंजन सागर जी महाराज यानी प्रवचनात सागीतलेकी संत शिरोमणी यांच्या जीवनात वाणीतील अस्सलपणा, साहित्यातील सर्जनशीलता आणि स्वभावातील साधेपणा यांचा त्रिवेणी संगम होता. ते अजिंक्यतेचे शिखर होते, त्यांची वितरागीपणा प्रमाण होती. ज्याचे जीवन मलयगिरी चंदनाइतके सुगंधित होते. ते सर्व जगाचे दिपस्तंभ होते.

आचार्य भगवानांची चेतना पुष्पराग प्रमाणे निष्पक्ष होती. त्यांना ना जातीपातीचे प्रयोजन होते, ना त्यांच्याकडे आमची - त्यांची असा भेदभाव होता. ना कोणाबद्दल राग होता. आचार्य श्रींचे जीवन सर्वांसाठी कल्याणकारी होते. आचार्य भगवानांचे जीवन वटवृक्षासारखे होते. त्यांच्या उपदेशात आणि चर्चेत महावीर दिसत होते. असे सागितलं यावेळी देशमुख नगर छत्रपती संभाजी नगर मधील समस्त जैन बांधवांनी आपला सहभाग नोंदवला. अष्टांनिका महापर्व निमित्त श्री सिद्धचक्र महामंडल विधान उपाध्याय विरंजन सागर जी महाराज याचा परम पावन सानिध्यात अष्टांनिका महापर्व निमित्त सिद्ध भगवताची भक्ति करण्यासाठी श्री सिद्ध चक्र महामंडल विधान आयोजन केले आहे हे विधान दि ३ ते १०जुलाई होईल. सकाळी ६:०० ते १०:०० पर्यत होईल. श्री मल्लिनाथ देशना भवन देशमुख नगर होनार आहे. तरी समाजबाधवानी वरील धार्मिक कार्यक्रम लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक: श्री भ.मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुख नगर शिवाजीनगर यानी केले आहे.

# अनिवासी भूखंडाच्या ई-लिलावाकरिता १७ जुलैपर्यंत मुदतवाढ

छत्रपती संभाजीनगर दि.१ (प्रतिनिधी)- गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक) मंडळातर्फे ०१ जून २०२५ रोजी ५२ अनिवासी भूखंडाच्या ई-लिलावाकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. ई-लिलावाकरिता ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या व ऑनलाईन पेमेंट स्विकृतीचा कालावधी मध्ये बदल करुन मुदतवाढ देण्यात आली आहे.

ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम ऑनलाईन भरणे यासाठी अंतिम दिनांक व वेळ १ जुलै, २०२५ होती. सुधारित दिनांक १७ जुलै, २०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

ई-लिलावाकरिता आरटीजीएस, एनईएफटी द्वारे अनामत रक्कम भरण्याची अंतिम दिनांक १८ जुलै, २०२५ रोजीपर्यंत संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणा करावी. ई-लिलाव (ऑनलाईन बोली) २२ जुलै, २०२५ रोजी ११.०० वाजता सुरू होईल. ई-लिलाव ऑनलाईन बोली अंतिम वेळ दुपारी ५.०० वाजेपर्यंत राहील.

ई-लिलावाचा एकत्रित निकाल २३ जुलै, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता जाहीर करण्यात येईल.

ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम भरणे इत्यादी करीता २ जुन, २०२५ रोजीच्या जाहिरातीमध्ये अन्य कोणताही बदल करण्यात आलेला नाही यांची नोंद घ्यावी असे मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

(पान १ वरुन)

## शेतकऱ्यांच्या मुद्यावरुन...

नाना पटोले यांना दिवसभरासाठी निलंबित करणार आल्याची घोषणा राहुल नार्वेकर यांनी केली. सभागृहाचं कामकाज चाललं पाहिजे, यासाठी मी नाना पटोले यांना निलंबित करत आहे, असे राहुल नार्वेकर यांनी म्हटले. तसेच, तुम्हाला निलंबित केलेले आहे, तुम्ही सभागृहाच्या बाहेर गेलं पाहिजे, असे राहुल नार्वेकर यांनी नाना पटोले यांना म्हटले. यानंतर नाना पटोले सभागृहाच्या बाहेर निघून गेले. नाना पटोले यांचे दिवसभरासाठी निलंबन करण्यात आल्याने विरोधकांनी सभात्याग केला.

दरम्यान नाना पटोले पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, आज शेतकऱ्यांचा दिवस आहे. भाजप महायुतीचे सरकार माज आलेले आहे. या सरकारची वास्तविकता आज समोर आली आहे. यांचे नेते शेतकऱ्यांना भिकारी समजतात. त्यांना कपडे हे घेऊन देतात. २०१४ च्या आधी लोणीकर उघडाच फिरत होता. जो शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलेल त्याला निलंबित करणे आणि जे अपमान करतात त्यांना सन्मानाने बसवायचे, अशी टीका नाना पटोले यांनी केली आहे.

## फेक नरेटिव्ह तयार करणारी ...

हद्पार करण्याचं काम तुम्ही केलं. तुम्ही केवळ मराठीच्या नावावर राजकारण करत राहिलात. मराठी माणसाला घर देणारे आम्ही आहोत. अभ्युदय नगर, बीडीडी चाळ या ठिकाणी राहणाऱ्या मराठी माणसाला घर देणारे आम्ही आहोत. निवडणुका आल्यानंतर यांना मराठी माणूस आठवतो.' असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

## रविंद्र चव्हाण भाजपाचे नवे...

होता. या कार्यक्रमात रविंद्र चव्हाण यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र भाजपा प्रदेशाध्यक्ष पदाच्या निवड प्रक्रियेत फक्त रविंद्र चव्हाण यांनी अर्ज दाखल केला होता. दुसरे कोणीही अर्ज दाखल न केल्यामुळे रविंद्र चव्हाण यांची भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

आगामी महापालिका निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर रविंद्र चव्हाण यांची निवड महत्वाची मानली जात आहे. रविंद्र चव्हाण हे डोंबिवली विधानसभा मतदारसंघातून चारवेळा निवडून आलेले आहेत. तसेच रविंद्र चव्हाण हे प्रभावी नेते असून त्यांचा तळागाळातील भाजपा कार्यकर्त्यांबरोबर दांडगा जनसंपर्क असल्याचं बोललं जातं.

## राणे कुटुंबाची चोच नेहमीच....

आहे. या पार्श्वभूमीवर नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. या पार्श्वभूमीवर भास्कर जाधव यांनी मंगळवारी विधानभवन परिसरात पत्रकारांशी बोलताना त्यांच्यावर जोरदार पलटवार केला आहे.

भास्कर जाधव म्हणाले, नारायण राणे यांना आता राज ठाकरे यांच्यावर प्रेम उफाळून आले आहे. ८ दिवसांपूर्वीच राज यांच्या पक्षाचे नेते प्रकाश महाजन यांनी नारायण राणे यांना त्यांची जागा दाखवून दिली होती. नारायण राणे हे एहसान फरामोश माणूस असल्याचे ते म्हणाले होते. त्यांनी दिलेले उत्तर पुरेसे आहे. नारायण राणे यांनी इतरांची काळजी करण्यापेक्षा त्यांनी त्यांचा पक्ष का सोडला? याचे उत्तर द्यावे. त्यांनी एक पक्ष काढला. त्यानंतर एका वर्षातच तो सोडला. त्यांनी काँग्रेसलाही सोडचिठ्ठी दिली. त्याचेही उत्तर त्यांनी महाराष्ट्राला द्यावे.

नारायण राणे यांनी चिपळूणच्या मेळाव्यात रवींद्र चव्हाण यांना का इशारा दिला? त्यांनी त्याचेही उत्तर दिले पाहिजे. खरे तर नारायण राणे व राणे कुटुंबाची चोच नेहमीच नरकात बुडालेली असते. परवाच्या दिवशी नेपाळी वॉचमन सारखा दिसणाऱ्या त्यांच्या मंत्री पोराने माझ्यावर कोणत्या भाषेत टीका केली? हेच मंत्री भाजप व देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात आहेत. त्यामुळे ज्या लोकांची चोच कायम नरकात बुडालेली असते अशा लोकांबद्दल मला विचारू नका, असे भास्कर जाधव म्हणाले.


Truhome FINANCE

**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अँण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात**) सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि १२.०८.२०२५ सकाळी ११.०० ते दु १२.००** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|
| **१) श्री. विनोद त्रिंबक साल्वे (कर्जदार)**<br>**२) श्रीमती श्रद्धा विनोद साल्वे (सह-कर्जदार)**<br>**सर्वांचा निवासाचा पत्ता आहे: हुडको एन-१३ वानखेडे नगरप्रतिक्षा किराणा शॉप जवळ औरंगाबाद H.Oऔरंगाबाद, महाराष्ट्र-४३१००१**<br>**तसेच येथे- हुडको एन-13, वानखडे नगर, औरंगाबाद४३१००१**<br>**तसेच- बंगला क्रमांक १२ ए, फ्लोरेंझा व्हिला,आतडे क्र.४२, गोलवाडी,पैठण रोड, सिडको, औरंगाबाद-४३१००५**<br>**कर्ज खाते क्रमांक SHLHAURD0000479 आणि SLPHAURD0000480**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार**<br>**२० जून २०२५ प्रतीकात्मक ताबा**<br>**ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी सूचना तारीख: १०/०४/२०२५<br>दिनांक ०९/०४/२०२५ रोजी कर्ज खाते क्र. SHLHAURD0000479 अंतर्गत रु.९३,१८,३२३/- (रुपये त्रेण्णव लाख अठरा हजार तीनशे तेवीस फक्त) आणि दिनांक ०७/०४/२०२५ रोजी कर्ज खाते क्र. SLPHAURD0000480 अंतर्गत रु.४,९०,६१३ /- (रुपये चार लाख नव्वद हजार सहाशे तेरा फक्त) सदर सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत करारानुसार व्याजदराने पुढील व्याजासह . | रु.१,६१,९३,८००/- (रुपये एक कोटी एकसष्ट लाख त्र्यानांव हजार आठशे फक्त)<br>**बोली वाढविणे :** रु. १०,०००/- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )**<br>रु. १६,१९,३८०/- (रुपये सोळा लाख एकोणीस हजार तीनशे ऐंशी फक्त)<br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : ११ ऑगस्ट २०२५ वेळ सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.** | **१२ ऑगस्ट २०२५**<br>**वेळ. सकाळी ११.०० ते दुपारी १२.००** | **अश्फाक पत्का- ९८१९४ १५४७७.**<br>**सुनील मानेकर ८९९९३४४८९७**<br>**अक्षय गुप्ता ८९८३५५२७३७**<br>**अजय झांझोत ९८२३३९०९९०**<br>**सचिन लकुले ९८९०५१९९९७**<br>**निरीक्षण तारीख: ११.०७.२०२५ वेळ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत.** |

**संपत्तीचे विवरण**

बंगला क्रमांक १२ अ चे सर्व तुकडे आणि पार्सल, ३०१ चौरस मीटर, २२६ चौरस मीटर कार्पेट, २३० चौरस मीटरचे भूखंड, फ्लोरेंझा व्हिला, गट नंबर 42, गोलवाडी, पैठण रोड, सिडको, औरंगाबाद खालील सीमारेषा-पूर्व: बंगला क्रमांक १७, दक्षिण: कंपाऊंड वॉल, पश्चिम: रस्ता, उत्तर: बंगला क्रमांक १२

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- ॲक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी 000०२३० येथे जमा करावी:**

ठिकाण - औरंगाबाद
दिनांक - ०२-०७-२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )